दिनांक :- 29/01/2024

# प्रसिध्दी पत्रक

खाजगी ईसम - किशोर बन्सीलाल कानिसे, वय 30 वर्षे, पद- विद्युत सहाय्यक (कंत्राटी), नेमणुक - उप अभियंता, महावितरण कार्यालय उप विभाग छावणी, छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांच्याकडुन लाचेची रोख रक्कम 5,000/- रुपये स्विकारल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | छत्रपती संभाजीनगर. |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे छावणी छत्रपती संभाजीनगर शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आ.लो.से. यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | किशोर बन्सीलाल कानिसे, वय 30 वर्षे, पद- विद्युत सहाय्यक (कंत्राटी), नेमणुक - उप अभियंता, महावितरण कार्यालय उप विभाग छावणी, छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागणी रक्कम | :- | 5500/- रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 5000/- रुपये. |
| तपास अधिकारी | :- | संगिता पाटील, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | यातील तक्रारदार यांचे राहते घरी नविन विद्युत मिटर बसविण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांचे राहते घरी लवकर नविन विदयुत मिटर बसविण्यासाठी आ.लो.से. कानिसे विदयुत सहायक ( कंत्राटी ) कामगार यांनी लोकसेवक हे माझ्या परिचयाचे असल्याचा प्रभाव तक्रारदार यांचेवर टाकुन तक्रारदार यांच्याकडे 5500/-रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन आजच दि. 29/01/2024 रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान खाजगी ईसम कानिसे यांनी तक्रारदार यांना रुपये 5500/- लाचेची मागणी केले बाबत निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर तर्फे आजच दि. 29/01/2024 रोजी सापळा आयोजीत केला असता, खाजगी ईसम किशोर कानिसे, विद्युत सहाय्यक (कंत्राटी) यांनी पंचा समक्ष तक्रारदार यांच्या कडुन तडजोडी अंती 5000/- रुपये लाचेची रक्कम केशरलॉन जवळ मिटमिटा छत्रपती संभाजीनगर येथे स्विकारली. लाचेच्या रकमेसह त्यास ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन छावणी छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, प्रभारी अपर पोलीस अधीक्षक राजीव तळेवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक संगिता पाटील यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस अंमलदार विलास चव्हाण, राजेंद्र सिनकर, चालक सी. एन. बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद

ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 9823498777

पोलीस उप अधीक्षक :- 8668752530


( राजीव तळेकर )

पोलीस उप अधिक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,

छत्रपती संभाजीनगर.